**दिनांक 08/03/2023**

# <u>प्रसिध्दी पत्रक</u>

आरोपी लोकसेवक श्री. दिलीप परशराम जऊळकर, वय 50 वर्षे, पद-वेतन अधीक्षक, प्राथमिक भविष्य निर्वाह निधी पथक, वेतन वितरण कार्यालय, जिल्हा परिषद औरंगाबाद (वर्ग-2) यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख रक्कम 50000/- रुपये स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे वेदांतनगर, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | दिलीप परशराम जऊळकर, वय 50 वर्षे, पद-वेतन अधीक्षक, प्राथमिक भविष्य निर्वाह निधी पथक वेतन वितरण कार्यालय जिल्हा परिषद, रेल्वेस्टेशन रोड औरंगाबाद (वर्ग-2) रा. प्लॉट नं.63, ए विंग, एन-4 सिडको औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | 50000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 50000/- रुपये. |
| तपास अधिकारी | :- | श्री. संदिप राजपुत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे वडिलांचे व पत्नीचे मेडीकल बील मंजूर करुन ट्रेझरी कार्यालय येथे पाठविण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांच्या वडिलांचे व पत्नीचे एकुण 14 मेडिकल बिल आ.लो.से. श्री. जऊळकर यांच्याकडे प्रलंबित असून सदर मेडिकल बिल तयार करुन मंजुरी करिता ट्रेझरी कार्यालय औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यासाठी 20 टक्क्याप्रमाणे आ.लो.से. श्री. जऊळकर हे तक्रारदार यांच्याकडे 50000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. श्री. जऊळकर यांनी तक्रारदार यांच्याकडे 50000/- रुपयाची लाचेची मागणी पंच साक्षीदारांसमक्ष केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि.08/03/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. जऊळकर यांनी लाचेची रक्कम 50000/-रुपये पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचेकडून वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथ.)कार्यालय जि.प.रेल्वे स्टेशन रोड औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह आ.लो.से.श्री. जऊळकर यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे वेदांतनगर औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधीक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदिप राजपुत यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस अंमलदार केवलसिंग गुसिंगे, रविंद्र काळे, चालक पो.अ. सी. एन. बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

**(मारुती शंकर पंडित)**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.